सकाळ



चिखली : येथील पोलिस ठाण्यात कर्मचाऱ्यांना सायबर गुन्हेविषयक माहिती देताना प्रतिभा महाविद्यालयाचे विद्यार्थी.

# प्रतिभा महाविद्यालयातर्फे सायबर सुरक्षेबाबत जागृती

**लोणावळा :** सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या घटनांमुळे आजच्या घडीला सायबर सुरक्षिततेविषयी जनजागृती करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. हाच उद्देश डोळ्यांसमोर ठेवून प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीजच्या विद्यार्थ्यांनी क्विक हिल फाउंडेशनच्या सहकार्याने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' विषयावर सायबर जनजागृती अभियान राबविण्यात आले. प्रतिभा कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रातील नागरिकांसह विविध पोलिस ठाण्यातील कार्यरत पोलिस कर्मचाऱ्यांना सायबर गुन्हे विषयक माहिती देत जनजागृती केली. यावेळी ओटीपी लिंक, फेक कॉल व ई-मेल धोके याविषयी माहिती देण्यात आली. या जनजागृती मोहिमेत प्रकल्प समन्वयक हार्दिक वच्चानी, क्विक हिल सीएसआर एक्झिक्युटिव्ह अजय शिर्के, गायत्री केसकर, दिपू सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली अनुष्का आंबेकर, राजीव उपाध्याय, संस्कृती सावंत, ओम जगताप या विद्यार्थ्यांनी जागृती केली.